# प्रेस नोट दि.२५/०५/२०१८

## (बेकायदेशिर पिस्तोल बाळगणा-यास गुन्हे शाखेचे गुंडा स्कॉड दक्षिण विभागाने केले जेरबंद )

पुणे शहर गुन्हेशाखेकडील संघटीत गुन्हेगारी विरोधी पथक दक्षिण विभागाचे इनचार्ज पोनिरी श्री.राम राजमाने व त्यांचा स्टाफ हे दि.२४/०५/२०१८ रोजी कोथरुड पोलीस स्टेशनचे हद्दीत गुन्हेगारी टोळयातील सदस्य यांना चेक करीत असताना पो निरी राजमाने यांना त्यांचे बातमीदारा कडुन बातमी मिळाली कि, कुश पवार नावाचा इसम चांदणी चौक पुणे या ठिकाणी त्याचे मित्रास भेटायला येणार असुन, त्याचेकडे पिस्तोल आहे.अशी खात्रीशीर बातमी मिळताच सदरचे बातमीप्रमाणे बातमीचे ठिकाणी सापळा लावुन, इसम नामे कुश नंदकुमार पवार वय २७ वर्ष रा तिसरा मजला, कमल आर्केड, शाळा चौक, तळेगाव दाभाडे, पुणे यास ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली तेंव्हा त्याचे डावे कमरे जवळ एक देशी बनावटीचे पिस्तुल व त्याचे मॅगझीनमध्ये एक जिवंत काडतुसे असे मिळून आले.असा एकुण मिळुन २५,५००/- चा मुद्देमाल गुन्हयाचे अनुषंगाने जप्त करण्यात आला आहे. त्याचे विरुध्द अजय उत्तेकर यांनी कोथरूड पो.ठाणे गु.र.न. १५०/२०१८ आर्म ॲक्ट कलम ३ (२५) व मुंबई पोलीस ॲक्ट कलम ३७ (१), सह १३५ प्रमाणे फिर्याद देवून गुन्हा दाखल करणेत आला आहे. **गुन्हयाचा पुढील तपास सहा.पोलीस फौजदार राजेंद्रसिंग चौहान हे करीत आहेत.**

अटक आरोपी कुश पवार याचेकडे सदरचे पिस्तोल हे कोठून आणले व त्याचा कोठे वापर केला का? याबाबतचा तपास करता, आरोपी कुश पवार याने दि.१६/०५/२०१८ रोजी त्याच्या घरा शेजारी राहणारा व ओळखीचा सोन्या-चांदीच्या दुकानात काम करणारा कारागिर नामे राम सुकुमार कोटाल वय २७ रा. तळेगाव दाभाडे, ता मावळ जि. पुणे याचे राहत्या घरी जावून कुश पवार याने पिस्तोलने गोळी झाडून राम कोटाल यास जखमी केले. राम कोटाल यांने कुश पवार याचे सांगणेवरून अज्ञात इसमा विरूध्द तळेगाव पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली, त्याबाबत गु.र.न.२८०/२०१८ भा.द.वि.क ३०७, भारताचा हत्यार कायदा कलम ३ सह २५ व महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१), सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदरचा गुन्हा हा कुश पवार यांने केल्याची कबुली दिली व कोथरूड पो.ठाणे कडील गुन्हयात जप्त केलेले पिस्तोल हे तळेगाव पोलीस स्टेशनकडील गुन्हयात वापरल्याचे निष्पन्न झाले आहे.

**सदरची कामगिरी गुन्हे शाखा, पुणे शहरचे श्री.प्रदिप देशपांडे सो-अपर पोलीस आयुक्त, गुन्हे., श्री.पंकज डहाणे सो,पोलीस उप आयुक्त,गुन्हे, श्री.समीर शेख सो-सपोआ,गुन्हे-१, यांचे मार्गदर्शनाखाली गुंडा स्कॉड दक्षिण विभागाचे पोलीस निरीक्षक श्री.राम राजमाने, सहा.पो.फौज.राजेंद्रसिंग चौहान, संजय बरकडे, सुनिल चिखले, सर्फराज शेख, प्रशांत पंवार, किरण ठवरे, रमेश चौधर, प्रविण पडवळ, राकेश खुणवे, कैलास सांळुके, विवेक जाधव, चालक- संभाजी गंगावणे यांनी केली आहे.**